# नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी व शैक्षणिक गुणवत्तेवर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात संस्थांचे पदाधिका-यांसाठी चर्चासत्र संपन्न



या चर्चासत्रात महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ. विकासचंद्र रस्तोगी, राज्यपालांचे प्रधान सचिव डॉ. संतोषकुमार, आय.आय.टी. मुंबईचे डॉ. बी. एम. जगताप, सुप्रसिध्द समुपदेशक श्री आनंद मापूसकर, कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे व प्र - कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे उपस्थित होते.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम केली आहे. सी. बी. सी. एस. प्रणाली शैक्षणिक सत्र २०२२- २३ पासून सर्व विद्याशाखेत लागू केली आहे. या अंतर्गत चवथ्या टप्प्यामध्ये विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या संस्थांचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांचेसाठी नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी व शैक्षणिक गुणवत्ता या विषयावर विद्यापीठात चर्चासत्र संपन्न झाले.



## विद्यार्थ्यांना सर्वकष शिक्षण मिळावे

**- डॉ. विकासचंद्र रस्तोगी**

नविन शैक्षणिक धोरणांतर्गत सी.बी.सी.एस. अभ्यास प्रणाली विद्यापीठाने लागू केल्यामुळे विद्यार्थ्यांना आवडीचे विषय निवडता येतील. त्यामुळे त्याला सर्वकष शिक्षण मिळेल. अमेरिकेत आणि भारतात आय.आय.टी. मध्ये ही संकल्पना लागू आहे. क्लस्टर महाविद्यालयाच्या संकल्पनेविषयी ते म्हणाले चांगले, उपयुक्त रोजगारक्षम कौशल्य वाढविणारे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकता यावे, यासाठी एकाच व्यवस्थापनांतर्गत असलेले विविध महाविद्यालायांचे एकत्रिकरण करणे आवश्यक आहे.दोन किंवा अधिक विद्यापीठांनी सुध्दा क्लस्टर करुन विद्यापीठांतर्गत अभ्यासक्रमाची सुवर्ण संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावयाची आहे. संस्था चालक त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ही सुवर्ण संधी उपलब्ध करुन देतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयातील शिक्षकांची दोन हजार पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करावी, प्राचार्यांची शंभर टक्के पदे भरावी, असेही ते म्हणाले.

## संस्थाचालकांनी जॉब ओरिएन्टेड कोर्सेस सुरू करावेत


**- प्रधान सचिव डॉ. संतोष कुमार**



नवीन राष्ट्रीय.शैक्षणिक धोरणामुळे विद्यापीठांना व महाविद्यालयांना शिक्षणाची नवी दिशा मिळाली आहे. काळाजी गरज ओळखून संस्थाचालकांनी जॉब ओरिएन्टेड कोर्सेस फ्रेम केले पाहिजे. उद्योजक होण्यासारखे रिसर्च ओरिएन्टेड काही अभ्यासक्रम महाविद्यालयांनी सुरु करावेत. चीनपेक्षा आपण खूप मागे आहोत. उद्योगांना कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे, ती पूर्ण होण्यासाठी संस्थाचालकांनी उद्योगांशी चर्चा करुन त्यांना अनुरुप अभ्यासक्रम सुरु करावेत. आपला विद्यार्थी हुशार आहे. त्याला उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी संस्थाचालकांनी सातत्याने पुढाकार घ्यावा. याशिवाय प्रत्येक शिक्षकांचे विद्यार्थ्यांकडून मूल्यमापन व्हावे. शिक्षकांनी नवनवीन गोष्टी शिकून त्याचा लाभ विद्यार्थांना करुन द्यावा, असेही ते म्हणाले.

# एन.ई.पी. ची अंमलबजावणी व्हावी

**- डॉ.बी.एम. जगताप**




राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, उच्च शिक्षणासाठी स्ट्रक्चरल व शैक्षणिक फ्रेमवर्क विषयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करतांना डॉ. जगताप म्हणाले, ६ लक्ष करोड रूपये खर्च करुन भारतीय पालक आपल्या मुलांना परदेशात पाठवितात. तो पैसा आपल्याला भारतात खर्च करावा लागेल. अमेरिकन सिस्टीम उच्च शिक्षणामध्ये लागू झाल्यानंतर आपल्या येथे समाजाला जे पाहिजे, त्यानुसार शिक्षण देण्याची गरज आहे. इंग्रजांनी लिपीक तयार होण्यापूरती शिक्षण पद्धती लागू केली आणि ती आजपर्यंत सुरु आहे. विद्यार्थ्यांना सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक बदलाला भविष्यात सामोरे जायचे आहे, त्यासाठी त्याला मल्टीडिसिप्लीनरी शिक्षण मिळायला पाहिजे. युनिटरी इन्स्टिटयुट, काही महाविद्यालयांचे क्लस्टर आदी तयार करावे लागेल. त्या अनुषंगाने महाविद्यालयांनी एकमेकांसोबत समन्वय ठेवून काम केले पाहिजे. क्लस्टर कॉलेजसाठी सामंजस्य करार करावा आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सातत्याने प्रयत्न होण्याची गरज आहे. समाजविज्ञान व मानवविज्ञानामध्ये संशोधन होण्याची गरज आहे. कारण शासनाला दिशा देण्याचे काम शिक्षण संस्थांच्या माध्यमातून व्हायला पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये सी.बी.सी.एस. प्रणालीने कशा पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकविले जावे, यासाठी टीप्स आहेत. याशिवाय क्रेडीट कसे घ्यायचे, स्कील कसे द्यायचे, कोर्स स्ट्रक्चर, संस्थास्तरावरील अभ्यासक्रम, एन्कॉयरी बेस्ड लर्निंग आदी बाबी सांगितल्या आहेत. शैक्षणिक

# गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे

**- डॉ. आनंद मापुसकर**



२०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करावयाची आहे. याशिवाय गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना द्यावयाचे आहे, त्याकरीता एन.ई.पी. मध्ये ज्या बाबी दिल्या आहेत, त्यातील आव्हाने संस्थाचालकांना संस्थास्तरावर सोडवावी लागतील.युजीसीने सुद्धा अनुरुप गाईडलाईन्समध्ये बदल केले पाहिजे. संस्थांमध्ये संस्थाचालकांनी एकत्रित येवून चांगले वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. जॉब पद्धतीमधील बदल, नॅक, एन.आय.आर.एफ., एन.ई.पी. च्या दृष्टीने संस्था विकास प्लॅन आदी व्यवस्थित तयार करावा लागेल. अभ्यासक्रम विकासासाठी प्रशिक्षण आणि समाज व उद्योग तसेच विदेशी कनेक्ट आणि एकूणच होणाया बदलांचा सामना करण्याकरीता संस्थाचालकांनी सजग राहिले पाहिजे, असेही ते म्हणाले.



# एन.ई.पी. अंमलबजावणी मध्ये विद्यापीठ अग्रेसर

**- कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे**

एन.ई.पी. गाईडलाईन्सनुसार सी.बी.सी.एस. अभ्यासक्रम प्रणाली विद्यापीठात लागू केली असून अमरावती विद्यापीठ त्यामध्ये अग्रेसर आहे.नवनवीन कोर्सेस विद्यापीठ सुरु करीत आहे. शिक्षकांना प्रशिक्षण दिल्या गेले आहे. नवीन अभ्यासक्रमानुसार पुस्तके तयार होत आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षण व अभ्यासक्रम देण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. महाविद्यालयांनी स्कील कोर्सेस सुरु करावेत, विद्यापीठ पॉलिसी देईल, थॉट देईल. महाविद्यालयांनी आपल्या विद्यार्थ्यांचे आदानप्रदान करावे. विद्यार्थ्यांना आवडीचं, आनंददायी शिक्षण मिळावे, यासाठी आमचे प्रयत्न फलश्रुत ठरत आहे. आमचे विद्याथी जगात काम करण्यास सक्षम होईल, असा विश्वास कुलगुरूंनी याप्रसंगी व्यक्त केला.



डॉ. आनंद मापुसकर यांचा सत्कार करतांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे



डॉ. बी. जगताप यांचा सत्कार करतांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे





**कार्यक्रमाला पाचही जिल्हांतील संस्थाचालक तसेच प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

सुरुवातीला प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ.जी.एल. गुल्हाने यांनी केले. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे उपाध्यक्ष श्री वसंत घुईखेडकर व प्र-कुलगुरूडॉ. विजयकुमार चौबे यांनी मनोगत व्यक्त केले. सत्तर ठिकाणी यापूवी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या राबविल्याबद्दल गौरव प्रमाणपत्र देवून कुलगुरूंनी याप्रसंगी सन्मान केला. विषयाच्या अनुषंगाने एच.आर.डी. संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता डॉ.एस.व्ही. डुडूल, डॉ. वैशाली गुडधे, डॉ.डी.डब्ल्यु. निचित व डॉ. मोना चिमोटे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या प्रभारी संचालक सौ. मोनाली तोटे पाटील आदींनी याप्रसंगी महत्वपूर्ण माहिती दिली. श्री वसंत घुईखेडकर व श्री वसंत पुरके तसेच सहभागी संस्थाचालकांनी प्रश्न विचारुन नवीन शैक्षणिक धोरणाची माहिती जाणून घेतली. संचालन उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी, तर आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. कार्यक्रमाला पाचही जिल्ह्यांतील संस्थाचालक तसेच प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.